25 वर्षे विकासाची
"माझे शहर, माझा अभिमान"

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता. ठाणे - 401 101 दुरध्वनी क्रं. 28192828

**पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग**

**जा.क्र.मिभा/मनपा/पा.पु.व मलनि/ ४३८ /२०२६-२७** **दि.०७ /०६/२०२६**

**विषय - प्रेस नोट प्रसिद्ध करणेबाबत.**

## // प्रेसनोट //

सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, भारतीय हवामान खात्याने अलनिनो (El Nino) च्या प्रभावामुळे यावर्षीचा पावसाळा ऑगस्ट पर्यंत लांबणार असल्याचे महाराष्ट्र शासनाच्या निदर्शनास आणून दिलेले आहे. त्याअनुषंगाने शासनाने जलसंपदा विभागास उपलब्ध पेयजलाचे नियोजन ऑगस्ट २०२६ पर्यंत करण्यासंबंधी सुचना दिलेल्या आहेत.

याअनुषंगाने मिरा भाईंदर शहराचा पाणी पुरवठा पंधरादिवसातून एकदा बंद राहणार आहे. सदरच्या कपातीच्या कालावधीत तसेच धरणातील अत्यल्प पाणी साठयाच्या अनुषंगाने पाणी बचतीसाठी नागरीकांना आवाहन करणे आवश्यक आहे. त्यासाठी आवाहनाचा मसुदा खालीलप्रमाणे आहे.

**मिरा-भाईंदर वासीयांना पाणी बचतीचे जाहीर आवाहन :-**

"भारतीय हवामान खात्याने यावर्षी अलनिनो (El Nino) चा प्रभाव असल्याने नैऋत्य मान्सून वारे सामान्यपेक्षा कमी वाहणार असल्याने पावसाळा दि. ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत लांबण्याची शक्यता असल्याचे शासनाच्या निदर्शनास आणून दिलेले आहे. तसेच सद्यस्थितीत तीव्र उन्हाळा असल्याने धरणातील पाणी साठयाचे बाष्पीभवनात वाढ होऊन दिवसेंदिवस पाणीसाठा कमी होत आहे. त्याचप्रमाणे विहीरी व कुपनळीकांच्या पाण्याच्या पातळीमध्ये मोठयाप्रमाणात घट झालेली आहे.

परिणामी शासनाने उपलब्ध पेयजलाचे नियोजन ऑगस्ट २०२६ पर्यंत करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. यास अनुसरुन मिरा भाईंदर शहराचा पाणी पुरवठा १५ दिवसातून १ दिवस बंद राहणार आहे. तरी शहरातील नागरीकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करुन पाणी बचत करावी. असे आवाहन करण्यात येत आहे.

**पाणी बचतीसाठीच्या उपाययोजना :-**

१) नळ सुरु ठेऊन कपडे धुणे, भांडी घासणे, दात घासणे, दाढी करणे टाळावे.
२) घरातील नळांची गळती दुरुस्त करावी.
३) शक्यतो रोज गाड्या धुवू नयेत त्या ऐवजी बोअरवेलच्या पाण्याने ओल्या केलेल्या कपड्याने गाड्या पुसाव्यात.
४) अंगणात शक्यतो पाणी मारु नये.
५) सोसायटीतील गळकी टाकी, पाईप, व्हॉल्व्ह दुरुस्त करावेत. इमारतींच्या छतावरील टाकी ओव्हरफ्लो होवू नये याची दक्षता घ्यावी. अन्यथा तक्रारी प्राप्त झाल्यास अथवा आढळून आल्यास संबंधीत इमारतीचे / सोसायटीचे नळ कनेक्शन खंडीत करण्यात येईल.

६) शक्यतो रोज आंघोळीसाठी शॉवर व टब बाथचा वापर करु नका.

७) स्वच्छता गृहामध्ये डुअल फ्लश वापर करावा.

८) इमारतीतील जिने धुण्यासाठी पिण्याचे पाणी वापरु नये.

९) पाण्याचा अनावश्यक साठा करु नये व साठा केलेले पाणी शिळे झाले म्हणून ओतून देण्याची सवय बंद करावी.

१०) इमारती / सोसायटी / संकुलांमधील तरण तलावास पिण्याचे पाणी वापरु नये व वारंवार पाणी बदलण्यात येऊ नये.

११) शक्यतो आठवड्यातील 5 दिवस धुण्यायोग्य सगळे कपडे एकत्र करुन एकाच दिवशी धुवावेत. इतर दिवशी गरज पडल्यास दररोज लागणारे छोटे कपडे हाताने कमी पाण्यात धुवावेत.

१२) कपडे धुण्याचे मशीन आठवड्यातून एकदा किंवा अगदी आवश्यक असेल तेव्हा दोनदाच आणि ते पुर्ण क्षमतेने वापरावे. (याने खूपच प्रमाणात पाण्याची बचत / मशीनचा पुर्ण क्षमतेने वापर होतो.)

१३) कपडे धुण्याचे मशीन किंवा हाताने कपडे धुवून निर्माण होणारे निरुपयोगी पाणी साठवण करून पुढचे 2 दिवस वापरावे जसे शक्य असेल तसे फ्लश, बाथरुम धुणे, फरशी पुसणे, गाड्या धुणे व बगीचा इत्यादीसाठी वापरावे.

१४) सद्यस्थितीत तीव्र उन्हाळा असल्यामुळे धरणातील पाणी साठा अत्यल्प झाला आहे. आपण एक जबाबदार नागरीक म्हणून पाण्याचा अपव्यय टाळून पाणी वाचवुया व या टंचाईच्या संकटाचा एकत्र सामना करुया.

वरील सर्व कर्तव्य आपण एक जबाबदार नागरीक म्हणून पार पाडाल याची आम्हाला खात्री आहे.

**(शरद नानेगांवकर)**
**कार्यकारी अभियंता**
**पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**प्रति,**
**जनसंपर्क अधिकारी,**
जनसंपर्क विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका